# पुणे विद्यापीठ

## शिक्षकेतर रिक्त पदांसाठी सुधारित जाहिरात

पुणे विद्यापीठ कार्यालयातील शासनमान्य रिक्त पदे सरळ सेवा प्रवेशाने भरण्यासाठी लोकमत आणि टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात क्र. २६ दिनांक १४ मे, २०१० आणि जाहिरात क्र.५६ दिनांक १२ ऑक्टोबर, २०१० प्रसिध्द करण्यात आली होती. जाहिरात क्र.२६ मधील **उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, कक्षाधिकारी (सर्वसाधारण), कक्षाधिकारी (लेखा) आणि उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)** आणि जाहिरात क्र. ५६ मधील **अंतर्गत हिशोब तपासनीस, सहायक वित्त अधिकारी, प्रोग्रॅमर, आरोग्य अधिकारी, उप अभियंता (विद्युत), उप अभियंता (स्थापत्य), कर्मशाळा अधिक्षक, स्थावर व्यवस्थापक (विद्युत नि सर्वसाधारण) आणि सहायक अभियंता (स्थापत्य)** या अ आणि ब गटातील पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता आणि अनुभव तसेच सर्वसाधारण सूचनांमध्ये काही बदल करण्यात आलेले आहेत. तसेच सदर जाहिरातीमध्ये काही नवीन पदांचा देखील समावेश करावयाचा असल्याने सुधारित जाहिरात देऊन नव्याने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सुधारित जाहिरातीनुसार नव्याने अर्ज करतांना विहित नमुन्यातील ऑनलाईन **(Online)** अर्ज दि. १२ नोव्हेंबर, २०११ पर्यंत भरावयाचा आहे. वरील पदांची शैक्षणिक अर्हता, पदनिहाय आरक्षण, अनुभव, वयोमर्यादा आणि वेतन इत्यादीसंबंधीची माहिती पुणे विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील संपूर्ण ऑन लाईन (Online) अर्ज शनिवार दि. १२ नोव्हेंबर, २०११ पर्यंत भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र आणि कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.३००/-चा व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१५०/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मंगळवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ पर्यंत कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७ यांच्याकडे पोस्टाने पाठवावा अथवा समक्ष जमा करावा. सदर दिनांकानंतर पोस्टाने किंवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

वरील पदांसाठी उपरोक्त नमूद केलेल्या जाहिरातींस अनुसरुन यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा नव्याने अर्ज करण्याची गरज नाही. परंतु सदर जाहिरातींस अनुसरुन यापूर्वी अर्ज केलेल्या ज्या उमेदवारांनी सुधारित जाहिरातीत नमूद केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव या संबंधीच्या अटी दरम्यानच्या कालावधीमध्ये पूर्ण केल्या असतील अथवा अधिकची पात्रता धारण केलेली असेल त्यांनी सुधारित जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनाकांपर्यत त्यासंबंधीच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती विद्यापीठाकडे पोस्टाने अथवा समक्ष सादर कराव्यात. तसेच सदर जाहिरातींस अनुसरुन यापूर्वी अर्ज केलेल्या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गातील तसेच महिला राखीव उमेदवारांनी दिनांक १ एप्रिल, २०११ पासून अथवा तद्नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. वरील जाहीरात क्र. २६ आणि ५६ नूसार यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत सुधारित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज भरावयाच्या अंतिम दिनाकांस वयोमर्यादा गणली जाईल.

जाहिरात क्र.: ३४ **डॉ.मा.ल.जाधव**
दिनांक : १८/१०/२०११ **कुलसचिव**

# पुणे विद्यापीठ

## - शिक्षकेतर रिक्त पदांसाठी सुधारित जाहिरात -

पुणे विद्यापीठ कार्यालयातील खालील शासनमान्य रिक्त आणि विद्यापीठ निधीतील पदे सरळ सेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **शनिवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०११ पर्यंत ऑन लाईन (Online)** अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील ऑन लाईन (Online) भरावयाचा अर्ज पुणे विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १. | उपकुलसचिव<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.६६०० | अ | ०७ | खुला - ४<br>(पैकी १ महिला)<br>विजा (अ)- १<br>इमाव - १<br>विमाप्र - १<br><br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अंध/अल्पदृष्टी - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी अथवा एच.एस.सी. नंतरची किमान पाच वर्षे शैक्षणिक कालावधीची पदवी / द्विपदवी उत्तीर्ण.<br>२. सहायक कुलसचिव समकक्षपदाचा वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.५४००/- मधील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>विद्यापीठ/ वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील पूर्णवेळ शिक्षक म्हणून अध्यापनाचा रू. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रू. ६०००/- मधील किमान पाच शैक्षणिक वर्षांचा अनुभव.<br>**अथवा**<br>वर विहीत केल्यानुसार प्रशासकीय आणि अध्यापनाचा असा एकूण किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| २. | अंतर्गत हिशोब तपासनीस<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.६६०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण आणि पदवी परीक्षेत कॉस्ट अकांऊटींग अथवा ॲडव्हान्स अकांऊटींग आणि ऑडिटींग विषय घेऊन पदवी परीक्षा उत्तीर्ण. सहायक वित्त अधिकारी अथवा समकक्ष पदाचा वेतन बँड रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.५४०० मधील किमान तीन वर्षांचा लेखा परीक्षण विषयक कामकाजाचा अनुभव.<br>**अथवा**<br>१. चार्टर्ड अकांऊटंट आणि संबंधित कामाचा तीन वर्षाचा अनुभव.<br>२. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| ३. | जनसंपर्क अधिकारी<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.६६०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास कम्युनिकेशन / जर्नालिझम / पब्लिक रिलेशन या विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण. प्रसारमाध्यमांमधील संबंधित कामाचा अथवा जनसंपर्क अधिकारी पदाचा रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन रू.५४०० या वेतनश्रेणीमधील किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>२. मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषांवर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ४. | सहायक कुलसचिव<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | १२ | खुला - ६<br>(पैकी २ महिला)<br>अनु.जाती - २<br>भज (ब) - १<br>इमाव - २<br>विमाप्र - १<br><br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अंध/अल्पदृष्टी - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी अथवा एच.एस.सी. नंतरची किमान पाच वर्षे शैक्षणिक कालावधीची पदवी / द्विपदवी उत्तीर्ण.<br>२. कक्षाधिकारी (सर्वसाधारण) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४४००/- मधील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>विद्यापीठ / वरिष्ठ / कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील पूर्ण वेळ शिक्षक म्हणून अध्यापनाचा किमान रू.९३००-३४८००, ग्रेड वेतन रू.४४०० या वेतनश्रेणीतील वर विहीत केल्यानुसार प्रशासकीय आणि अध्यापनाचा असा एकूण किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>**अथवा**<br>वर विहीत केलेल्या प्रकारचा किमान दोन वर्षांचा प्रशासकीय आणि महाविद्यालयीन (कनिष्ठ / वरिष्ठ) स्तरावरील पूर्ण वेळ मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून अध्यापनाचा असा एकूण किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ५. | सहायक वित्त अधिकारी<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण आणि पदवी परीक्षेत कॉस्ट अकांऊटींग अथवा ॲडव्हान्स अकांऊटींग आणि ऑडिटींग विषय घेऊन परीक्षा उत्तीर्ण आणि कक्षाधिकारी (लेखा) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४४००/- मधील तीन वर्षांचा वित्तीय कामकाजाचा अनुभव.<br>**अथवा**<br>१. चार्टर्ड अकाऊन्टंट<br>२. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| ६. | प्रोग्रॅमर<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | ०८ | खुला ४<br>(पैकी १ महिला)<br>अनु.जाती १<br>विजा(अ) १<br>इमाव - २<br><br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अंध/अल्पदृष्टी - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) / एम.सी.एस. /एम.सी.ए. (विज्ञान)/ अभियांत्रिकी (कॉम्प्युटर / इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) एम.सी.एम. पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br><br>**अथवा**<br><br>१. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एस्सी. (भौतिकशास्त्र/ गणित/ संख्याशास्त्र) परीक्षा प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण आणि संगणक शास्त्र/ माहिती तंत्रज्ञान मधील पदव्युत्तर पदविका प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण किंवा डीओईएसीसीची ए लेव्हलची परीक्षा उत्तीर्ण.<br><br>२ शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रकल्प/ लिनक्स सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेशन /वेब डिझायनिंग/ डेव्हलपमेंट यामधील किमान पाच वर्षांचा अनुभव. |
| ७. | आरोग्य अधिकारी<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.५४०० | अ | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यक विद्याशाखेतील एम.बी.बी.एस. पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय व्यवसायाचा किमान पाच वर्षांचा अनुभव.<br>३. मराठीतील लेखन/वाचनाचे ज्ञान आवश्यक.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ८. | उप अभियंता (विद्युत)<br><br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.५४०० | अ | ०१ | खुला - १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमध्ये संबंधित क्षेत्रात काम केल्याचा किमान सात वर्षांचा अनुभव, आणि कारखाना, सब स्टेशन, उच्चदाब विद्युत वाहिनी, जनरेटर, दूरध्वनी यंत्रणा, वातानुकूलित यंत्रे, निवासी व अनिवासी इमारती यांचे विद्युत परिक्षण व नवीन इमारतींचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन तसेच प्रत्यक्ष काम करवून घेण्याची क्षमता असणे आवश्यक.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| ९. | उप अभियंता (स्थापत्य)<br><br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.५४००/- | अ | ०१ | खुला - १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकामाच्या पर्यवेक्षणाचा स्थापत्य अभियांत्रिकी संबंधीचा तसेच व्यवस्थापन, दैनंदिन पत्रव्यवहार, निविदा व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामाचा किमान सात वर्षांचा अनुभव अथवा सहायक/कनिष्ठ अभियंता पदाचा वेतन बँड ९३००-३४८००, ग्रेड वेतन रु. ४४०० या वेतनश्रेणीतील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| १०. | कर्मशाळा अधिक्षक<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी (मेकॅनिकल/ईलेक्ट्रिकल) पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा अभियांत्रिकी पदविका (मेकॅनिकल / ईलेक्ट्रिकल) प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण.<br>२. शासकीय अथवा मान्यताप्राप्त संस्थेमधील पोस्ट डिप्लोमा इन टूल अॅण्ड डाय डिझाईनचा किमान एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३. ऑटोकॅड कॅम, प्रो-ई, कटिया, अॅन्सिस इत्यादीचे ज्ञान असल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>४. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील मॅकेनिकल आणि इलेक्ट्रोमॅकेनिकल संशोधन सामुग्री, मशिन टूल आणि डाय डिझाईन, एस.पी.एम. आणि उपकरणे डिझाईन, ड्रॉईंग, मॅन्युफॅक्चरिंग, फॅब्रिकेशन, मॅन्टनेंसमधील किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>५. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| ११. | स्थावर व्यवस्थापक<br>(विद्युत नि सर्वसाधारण)<br><br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br><br>ग्रेड पे रू.४४००/- | ब | ०१ | खुला - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण अथवा विद्युत अभियांत्रिकी पदविका प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील संबंधित क्षेत्रातील कामाचा तसेच दैनंदिन कामाचे पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याचा किमान तीन वर्षे अनुभव.<br>३. कारखाना, सब स्टेशन, उच्चदाब विद्युत वाहिनी जनरेटर, दूरध्वनी यंत्रणा, वातानुकूलित यंत्रे, निवासी व अनिवासी इमारतींचे विद्युत परीक्षण व नवीन इमारतींचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन, प्रत्यक्ष काम करवून घेण्याची क्षमता असणे आवश्यक.<br>४. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १२. | सहायक अभियंता (स्थापत्य)<br><br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.४४००/- | ब | ०१ | अनु.जाती - १ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी परीक्षा उत्तीर्ण अथवा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका परीक्षा प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण तसेच दैनंदिन कामाचे पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारनामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादीचा किमान तीन वर्षांचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| १३. | कक्षाधिकारी (सर्वसाधारण)<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | १९ | खुला - ९<br>(पैकी २ महिला )<br>अनु.जाती - ३<br>अनु.जमाती - १<br>भ.ज.(ब) - १<br>भ.ज.(क) - १<br>इमाव - ४<br>(उपरोक्त सर्व पदांपैकी अस्थिव्यंग - १) | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण. सहायक कक्षाधिकारी (सर्वसाधारण) अथवा समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४३००/- यामधील किमान तीन वर्षांचा प्रशासकीय कामाचा अनुभव किंवा शासकीय सेवेतील अथवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील गट 'क' मधील एकूण १२ वर्षाचा कार्यालयीन / प्रशासकीय कामकाजाचा अनुभव.<br>२. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १४. | कक्षाधिकारी (लेखा)<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | ०५ | खुला - ३<br>भज (ब) - १<br>विमाप्र - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.कॉम. पदवी उत्तीर्ण.<br>२. सहायक कक्षाधिकारी (लेखा) समकक्ष पदावरील वेतन बँड रु.९३००-३४८००, ग्रेड वेतन रु.४३००/- मधील तीन वर्षांचा वित्तीय (लेखा) कामाचा अनुभव किंवा शासकीय सेवेतील अथवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील लेखा विभागातील गट क मधील एकूण १२ वर्षाचा वित्तीय कामकाजाचा अनुभव.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |
| १५. | उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी)<br>वेतन बँड : रु.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन : रु.४४०० | ब | ०१ | अनु.जाती - १ | १. एस.एस.सी. उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य)<br>२. मराठी लघुलेखन - १२० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखन - ४० श.प्र.मि. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. इंग्रजी लघुलेखन असल्यास प्राधान्य.<br>३. संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र. |

| अ. क्र. | पदनाम, वेतनबँड व ग्रेड वेतन | पदाचा वर्ग | पद संख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| | **पाच वर्षे कालावधीसाठी निर्माण केलेले विद्यापीठ निधीतील पद :** | | | | |
| १६. | विशेष कार्याधिकारी<br>वेतन बँड : रु.१५६००-३९१००<br>ग्रेड वेतन : रु.७६०० | अ | ०२ | खुला - १<br>अनु.जाती - १ | Good academic record with a doctoral degree or equivalent published work. In addition to these, candidates who join from outside the University system shall also possess at least 55% of marks or an equivalent grade of B in the 7 point scale with latter grades O, A, B, C, D, E & F at the Master's degree level.<br><br>Five years experience of teaching / research/ extension education. Research contributions as evidenced by publications in reputed journals /books. |

## - सर्वसाधारण सूचना -

- **अर्ज शुल्क आणि अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत व पत्ताः**

**ऑन लाईन (Online)** अर्ज **शनिवार दि. १२ नोव्हेंबर, २०११** पर्यंत भरुन त्याची प्रिंट आऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, नजिकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र आणि कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नांवे काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु. ३००/-चा व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.१५०/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) **मंगळवार, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ पर्यंत मा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७** यांच्याकडे पोस्टाने पाठवावा अथवा समक्ष जमा करावा. सदर दिनांकानंतर पोस्टाने किंवा इतर माध्यमातून प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

- **वयोमर्यादाः**

१. अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.
२. पद क्रमांक **१** ते **९** साठी किमान ३० वर्षे आणि कमाल ४० वर्षे.
(मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षे शिथीलक्षम)
३. पद क्रमांक **१० ते १५** साठी किमान २५ वर्षे आणि कमाल ३५ वर्षे.
(मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षे शिथीलक्षम.)
४. पद क्रमांक **१६** साठी वयोमर्यादेची अट नाही.
५. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील अनुसूचित उल्लेख करण्यात आलेल्या विद्यापीठातील आणि पुणे विद्यापीठ क्षेत्रातील महाविद्यालयात कार्यरत सेवकांसाठी उच्चतम वयोमर्यादेची अट लागू नाही.
६. राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.
७. खुला तसेच राखीव प्रवर्गातील अपंग उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेची अट वयाच्या ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.
८. शासन निर्णयातील तरतूदीनूसार खेळाडूसाठी राखीव असलेल्या पदांसाठी खेळांडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून वयोमर्यादा विहित वयोमर्यादेपेक्षा पाच वर्षे शिथिलक्षम राहील.
९. खुल्या तसेच राखीव प्रवर्गातील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक व स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना वयोमर्यादा वयाच्या ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

- **अपंगासाठीचे आरक्षण :**

१) अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा व वयोमर्यादेतील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे. त्या संबंधीचे जिल्हा शल्यचिकित्सक किंवा केंद्र / राज्य शासनाने यासाठी स्थापन केलेली मंडळे यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२) फक्त कायम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

३) अपंग प्रवर्गासाठी नमूद केलेले आरक्षण अंध / अल्पदृष्टी, कर्णबधीर, अस्थिव्यंग या क्रमाने अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **मागासवर्गीयांचे आरक्षण :**

१) जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाच्या, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (दिनांक ०१/०४/२०११ पासून किंवा तद्नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

३) उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. किंवा इ.मा.व. प्रवर्गातील तसेच खुल्या गटातील महिला, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांनी वयोमर्यादा,आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

४) दिनांक २६ मार्च, २०१० च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्ती देताना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.

५) सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **महिलासाठींचे आरक्षण :**

भरतीच्या वर्षात त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. आणि इ.मा.व. प्रवर्गाचा दावा करणा-या आणि खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवार तसेच अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अशा उमेदवारांचा महिला साठीच्या आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (दिनांक ०१/०४/२०११ पासून किंवा तद्नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन:**

१) शासनाने शासकीय विभागातील गट - अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५,दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **लेखी परीक्षा :**

सदर जाहिरातीमध्ये पद क्रमांक १ ते १५ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्याने लेखी परीक्षा संदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या **http://recruitment.unipune.ac.in** या संकेतस्थळावर त्या-त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरतीप्रक्रिया पूर्ण हाईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी.

❑ **इतर सूचना :**

१) शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक, आदेश इत्यादी भरती प्रक्रियेला लागू राहतील.

२) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास पुणे, अहमदनगर आणि नाशिक येथील पुणे विद्यापीठाच्या कार्यालयात नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.

३) उमेदवाराचा अर्जात दिलेला पत्रव्यवहाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक बदलल्यामुळे अथवा बंद केल्यामुळे अथवा टपाल विभागाच्या विलंबामुळे परीक्षेची संधी हुकल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

४) अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत अर्जाच्या प्रिंटआऊट सोबत जोडावी. विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षंकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना विद्यापीठाच्या http://recruitment.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी.

६) दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नंतर शासनमान्य पदावर नियुक्ती झालेल्यांना महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार निवृत्ती वेतनाचे नियम लागू राहतील.

७) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑन लाईन (Online) भरावा.

८) ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (अर्जाच्या प्रिंटआऊट सोबत जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि असल्यास जाती वैधता प्रमाणपत्राची प्रत जोडावी.) महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

९) सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र अर्जाच्या प्रिंट आऊट सोबत पाठविणे आवश्यक आहे.

१०) शासन निर्णयानुसार एम.एस.सी.आय.टी अथवा डी.ओ.इ.ए.सी.सी संस्थेचा 'सी.सी.सी.' किंवा 'ओ' स्तर, किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तर परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता आवश्यक आहे. निवड झालेला उमेदवार ही अर्हता धारण करीत नसल्यास त्यांनी नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षात वरील संगणक अर्हता धारण करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

११) भरतीप्रक्रियेच्या संबंधित अधिकारी व सेवकांवर उमेदवाराने कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१२) उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती /कागदपत्रे खोटी / बनावट असल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

१३) मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४) अर्जाची स्वीकृती किंवा तो नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५) अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१६) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

**जाहिरात क्रमांक : ३४**
**दिनांक : १८/१०/२०११**

**डॉ. मा. ल. जाधव**
कुलसचिव